International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# महिला स्टार्टअपचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान

**मोरे स्वप्नाली शिवाजी**

*रयत शिक्षण संस्था नारायणराव बोरावके कॉलेज, ता. श्रीरामपूर (स्वायत्त) जिल्हा अहिल्यानगर,*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.*

*Corresponding Author – मोरे स्वप्नाली शिवाजी*

**DOI - 10.5281/zenodo.18861512**

**प्रस्तावना:**

भारत स्टार्टअप इंडियाचे एक दशक 16 जानेवारी 2026 रोजी साजरा करीत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीनी नाविण्यपूर्ण संकल्पना, नवनिर्मिती, रोजगार निर्मितीमधून भारताची अर्थव्यवस्था शाश्वत पध्दतीने वाढावी म्हणून 16 जानेवारी 2016 ला स्टार्टअप इंडिया उपक्रमाची सुरूवात झाली. स्टार्टअप उपक्रम असा आहे जो असा कोणता भारताचा जिल्हा, भारताचा कोणता भाग नाही जिथे स्टार्टअप पोहचलेले नाही. म्हणून भारताचे पंतप्रधान म्हणतात "स्टार्टअपची वाढ ही घातांकिय पध्दतीने होत आहे." म्हणून भारताची स्टार्टअप परिसंस्था ही जगातील सर्वोत्तम वाढणारी परिसंस्था निर्माण झाली. 2016 ला अवघ्या 500 च्या आकडेवारी पासून सुरू झालेली हि योजना 2026 मध्ये 2 लाख स्टार्टअपचा आकडा पार करून पुढे जात आहे. कृषी, आयटी, टेलिमेडिसिन, मायक्रो फायनान्स, पर्यटन आणि शैक्षणिक तंत्रज्ञान यासारख्या उपाययोजनाचा वापर करून स्टार्टअप्स भारतातील ग्रामीण-शहरी दरी भरून काढत आहेत. या परिस्थितीत महिलांच्या नेतृत्वाखाली स्टार्टअप्स समावेशक आणि प्रादेशिकदृष्ट्या संतुलित वाढीचा एक प्रमुख चालक म्हणून उदयास येत आहेत. 48% पेक्षा जास्त मान्यताप्राप्त स्टार्टअपमध्ये डिसेंबर 2025 पर्यंत किमान एक महिला संचालक/भागीदार आहे. हे केवळ आर्थिक इंजिन म्हणून नव्हे तर सामाजिक समता आणि संतुलित चालक म्हणून नवोपक्राचा उदय दर्शवते.

महिला उद्योजक नवोन्मेष आणि लवचिकतेचे तेजस्वी दिवे म्हणून उदयास येत आहेत. महिला उद्योजक हे दृढनिश्चय सर्जनशीलता आणि सक्षमीकरणाचे शक्तिशाली उदाहरण आहेत, जे असंख्य इतरांना मोठे स्वप्न पाहण्यास प्रेरित करतात. 73, 151 स्टार्टअप ला 31 ऑक्टोबर 2024 पर्यंत मान्यता देण्यात आली. हे सरकारव्दारे समर्पित 1,52,139 स्टार्टअप्सपैकी जवळपास निम्मे आहे. जे नवोपक्रम आणि आर्थिक विकासात महिलांची महत्त्वाची भूमिका दर्शविते. 2025 पर्यंत 75,935 महिला संचालक असलेले स्टार्टअप्सची संख्या आहे.

**भारत सरकारची स्टार्टअपची व्याख्या-जी.एस.आर 127 (ई) दिनांक 19 फेब्रुवारी 2019:**

अ) जर ती कंपनी खाजगी मर्यादीत कंपनी म्हणून (कंपनी कायदा 2013) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे किंवा भागीदारी फर्म म्हणून नोंदणीकृत असेल.

ब) स्थापनेपासून कोणत्याही आर्थिक वर्षातील संस्थेची/ कंपनीची उलाढाल 100 कोटी रूपयांच्या वर झालेली नसावी.

क) एखादी संस्था उत्पादने किंवा प्रक्रिया सेवांमध्ये नवोपक्रम विकास किंवा सुधारणा करण्यासाठी काम करत

असेल किंवा जर तो रोजगार निर्मिती आणि संपत्ती निर्मितीची क्षमता असलेले स्केलेबल मॉडेल असेल.

**संशोधन समस्येचे विधान:**

1) महिला स्टार्टअप्सची सध्याची प्रगती आणि सद्यस्थिती कशी आहे?
2) महिला स्टार्टअप्सचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाले?

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) महिला स्टार्टअप्सची प्रगती आणि सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
2) महिला स्टार्टअप्सचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

**अभ्यास विषयाची व्याप्ती :**

सदर संशोधन पेपरचा अभ्यास करताना फक्त महिला स्टार्टअप्स योजनांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. महिला स्टार्टअप्सची व्याप्ती मोठी असल्याने काही ठराविक योजना विचारात घेण्यात आलेल्या आहेत. भारतातील काही टॉपची राज्ये प्रखरतेने विचारात घेतली आहेत. महिला स्टार्टअप्सना सरकारने दिलेल्या पाठबळाचा ज्या योजनेतून प्रखरतेने उल्लेख होतो त्या योजनांचा आढावा घेतला आहे.

**मर्यादा :**

दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत महिला स्टार्टअप्सचे योगदान, स्टार्टअप्सच्या वेगवेगळया योजना चा अभ्यास करताना उद्दिष्टांना लक्षून काही ठराविक योजनांचा आकडेवारीचा आढावा सदर संशोधन पेपर मध्ये घेतला आहे.

**संशोधन पध्दती :**

दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे. दुय्यम तथ्य संकलनामध्ये स्टार्टअप्सचे वार्षिक अहवाल, शोधनिबंध, जर्नल्स भारताची आर्थिक पाहणी अहवाल, निती आयोगाचे अहवाल, प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (PIB), वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची आकडेवारी अशा वेगवेगळया अहवाल, संकेतस्थळे यांचा समावेश यात केला आहे.

**सांख्यिकीय साधणे :**

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने 2016 मध्ये नॅशनल इनिशियटिव्ह फॉर डेव्हलपिंग अँड हार्नोसिंग इनोव्हेशन (NIDHI) हा कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमामध्ये महिलांच्या नेतृत्वाखालील स्टर्टअप्सचा समावेश आहे.

**तक्ता क्र. 1: निधी कार्यक्रमांतर्गत महिला-नेतृत्वाखालील स्टार्टअप/महिला नवोन्मेषकांना पाठिंबा (वर्षानुसार)**

| आर्थिक वर्ष | नवोन्मेषकांना पाठिंबा आणि निधी मिळालेल्यांची संख्या |
|---|---|
| 2017-18 | 23 |
| 2018-19 | 34 |
| 2019-20 | 34 |
| 2020-21 | 81 |
| 2021-22 | 67 |
| 2022-23 | 99 |
| 2023-24 | 152 |
| 2024-25 | 140 |
| 2025-26 | 84 |
| **एकूण** | **714** |


**आलेख 1: महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप / महिला इनोव्हेंटर्सना पाठिंबा आणि निधी देण्यात आला त्यांची संख्या**

आघाडीची राज्ये 1) कर्नाटक-148 2) तामिळनाडू - 107 3) महाराष्ट्र - 96 4) तेलंगणा-60 5) गुजरात-40




वरील आलेख क्र. 1.1 मध्ये कर्नाटक हे राज्य टॉप परफॉर्मन्स आहे. सध्याच्या वित्त चक्रात महिला उद्योजकांना अधिक पाठिंबा देण्यासाठी आणि समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी वरील विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे प्रयत्न सतत चालू आहे. ज्यामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळते.

**आलेख क्र. 2: 31 ऑक्टोबर 2023 पर्यंत किमान एक महिला संचालक असलेल्या डीपीआयआयटी मान्यताप्राप्त स्टार्टअप्सची क्षेत्रवार संख्या**




स्टार्टअप्स हे 57 वेगवेगळ्या क्षेत्रात विभागले गेले आहे. वरील आलेख क्र. 1.2 मध्ये आयटीक्षेत्र, आरोग्यसेवा, आणि जीवनविज्ञान, शिक्षण, अन्न आणि पेये, शेती ह्या क्षेत्रामध्ये मोठ्याप्रमाणात महिला स्टार्टअप्सचा सहभाग दिसून येतो. वरील क्षेत्र धरून 57 क्षेत्रामध्ये 2023 च्या आकडेवारी नुसार 54,569 महिला संचालक महत्वाची भूमीका बजावत आहे

**तक्ता क्र. 2: गेल्या पाच वर्षात ESDP योजनेअंतर्गत प्रशिक्षित महिला लाभार्थींची माहिती**

| **आर्थिक वर्ष** | **महिला लाभार्थ्यांची संख्या** |
|---|---|
| 2020-21 | 13705 |
| 2021-22 | 25371 |
| 2022-23 | 121058 |
| 2023-24 | 201706 |
| 2024-25 | 173277 |
| **एकूण** | **535177** |

उद्योजकता सह कौशल्य कार्यक्रम (ईएसडीपी) ॲडव्हान्स, ईएसडीपी हा घटक नव्याने जेडण्यात आला आहे. जो आयआयटी/ आयआयएमएस/ आयसीएआर/ बीएआरसी/ राज्य केंद्र सरकारच्या कृषी विद्यापीठांसारख्या प्रभुख संस्थांव्दारे आयोजित केला जाईल. वरील आकडेवारी 2020-21 ते 2024-25 या कालावधीत एकूण लाभार्थ्यांची संख्या दर्शवते.

**परिणाम आणि चर्चा :**

लिंगभावाच्या दृष्टीकोनातून, गेल्या वर्षात महिला कामगार दल सहभाग दर वाढत आहे. 2017-18 मध्ये 23.3 टक्के होता. तो 2023-24 मध्ये 41.7 टक्के झाला आहे. पर्यायी गुंतवणूक निधी (AIFS) व्दारे 149 महिला-नेतृत्वाखालील स्टार्टअप्समध्ये रू 3,107.11 कोटी गुंतवले गेले आहेत. स्टार्टअप इंडिया सीड फंड स्कीम (SIFS) ने 1,278 महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्ससाठी रू 227.12 कोटी निधी मंजूर केला आहे. क्रेडिट-गॅरंटी स्कीम ने महिला नेतृत्वाखालील उद्योगांसाठी रू 24.6 कोटी किंमतीच्या कर्जाची हमी दिली. वरील कार्यक्रमामुळे महिला उद्योजकांना आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन प्रदान करतात. किमान एक महिला संस्थापक असलेल्या व्यवसायांमध्ये अधिक समावेशक कार्य संस्कृती आहे. पुरूषांपेक्षा 3 पट जास्त महिलांना रोजगार देतात आणि 10% पेक्षा अधिक संचयी महसूल निर्माण करतात.

**निष्कर्ष :**

महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी आणि महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्ससाठी परिसंस्था मजबूत करण्यासाठी भारत सरकारने ज्या योजना राबवल्या त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम दिसून येतो. भरतातील महिलांच्या स्टार्टअप्स योजनाच्या सद्यस्थिती आणि प्रगतीवरून भारतीय स्टार्टअप परिसंस्था वेगाने वाढत आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील 52 दशलक्ष उद्योगापैकी 82% सूक्ष्म, युनिटस्मध्ये (एमएसएमई) आहे. ज्यापैकी सुमारे 20% महिलांच्या मालकीचे आहे. ज्यांच्या माध्यमातून 2.2 ते 2.7 दशलक्ष लोकांना रोजगार उपलब्ध होतात. स्टार्टअप इंडिया हब, राष्ट्रीय स्टार्टअप पुरस्कार, प्रादेशिक सक्षमीकरण, राज्यस्तरीय स्टार्टअप रॅंकिंग या उपक्रमांचा एकत्रित उद्देश महिलांच्या आर्थिक समावेशन, मार्गदर्शन आणि बाजारपेठेच्या संधी वाढवणे यासाठी मदत करते. शाश्वत आणि समावेशक आर्थिक विकासात महिला स्टार्टअप्स योगदान देत आहेत. संधी आणि पाठिंबा मिळाल्यास महिला अमर्याद क्षमता कशा प्रकारे दाखवू शकतात हे दिसून येते.

**शिफारसी :**

उद्योजकतेमध्ये मालकी प्रामुख्याने पुरूषांकडेच आहे. सर्व सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपैकी फक्त 22 टक्के महिला उद्योजकांच्या मालकीची आहे. उद्योगांचा आकार सूक्ष्म ते लघु ते मध्यम उद्योगात जसजसा वाढत जातो तसतसे मालकीमध्ये महिलांचा वाटा अनुक्रमे 22 टक्क्यांवरून 12 टक्के आणि नंतर 7 टक्के इतका कमी होतो. तथापि तो हिस्सा सतत वाढावा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिला परिसंस्था निर्माण करण्यासाठी नाविण्यपूर्ण उपायांची आवश्यकता आहे. कर्ज उपलब्धता, कौशल्य प्रशिक्षण आणि औपचारिकरणावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या सरकारी उपक्रमांची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**

1) National-Report-state's startup Ecosystem Ranking.
2) Employment statistics in focus-April 2023
3) Parliament Question : women-led start-ups under nidhi

4) स्टार्टअप इंडियाचे एक दशक - Press Information Bureau
5) India's women Enterpreneurs
6) Niti Aayog's Report
7) Msme Annual Report 2024-25
8) आर्थिक समिक्षा - 2024-25
9) www.startupindia.in
10) The Indian startup Ecosystem For women Enterpreneurs